# जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.

## जाहीर नोटीस

**विषय** – किर्लोस्कर कंपनीचे आठ जनरेटरचे देखभाल व दुरुस्ती करणे बाबत..

या जाहीर नोटीसव्दारे जनरेटर दुरुस्ती करणारे यांना कळविण्यांत येते की, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद व अधिपत्याखालील न्यायालयाचे उस्मानाबाद/उमरगा/लोहारा/तुळजापुर/भूम/वाशी/कळंब या न्यायालयातील किर्लोस्कर कंपीनचे आठ ०८ किर्लोस्कर कंपनीचे मोठे जनरेटरची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे बाबत.

त्याकरीता या नोटीसव्दारे सर्व किर्लोस्कर जनरेटर दुरुस्ती करणारे यांना सुचित करण्यांत येते की, वर नमुद केल्याप्रमाणे ई–कोर्टअंतर्गत प्राप्त झालेले इच्छुक असतील त्यांनी दरपत्रके/निविदा खालील अटी व शर्तीस अधीन राहुन सदर निविदा जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर व संकेत स्थळावर प्रसिध्द झालेपासुन ०७ दिवसाचे आंत, म्हणजेच दिनांक १५.११.२०२१ पासुन दिनांक २२.११.२०२१ सायंकाळी ५.३० वाजेपर्यन्त प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नांवे बंद लखोटयात समक्ष अथवा टपालाव्दारे पोहोचतील या बेताने पाठवावेत.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

०१. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नांवे असावे.

०२. दरपत्रकाचा बंद लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नांवे पत्ता लिहुन पाठवावा.

०३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेपर्यन्तच आलेली दरपत्रके विचारात घेतले जातील.

०४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्याचे असेल त्याची दरपत्रके विचारात घेण्यांत येतील दरपत्रकामध्ये खाडाखोड करण्यांत येवु नये.

०५. दुरुस्तीसाठी असणा–या जनरेटरची दुरुस्ती चांगल्या प्रकारे व दिलेल्या वेळेत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

०६. दरपत्रके नाकारण्याचा पुर्णतः अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश साहेब, उस्मानाबाद यांचा राहील.

आज दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

जा.क्र.रोविले/ ४७०६ /२०२१.
जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद
दिनांक १५ नोव्हेंबर,२०२१.

| | | |
|---|---|---|
| ( श्रीमती एन.एच.मखरे) | ( व्ही.आर.दासरी) | ( श्रीमती एस.एस.माने) |
| जिल्हा न्यायाधीश –३, | सह दिवाणी न्यायाधीश, | ३रे सह दिवाणी न्यायाधीश, |
| उस्मानाबाद. | उस्मानाबाद. | उस्मानाबाद. |

<u>याची एक प्रत</u> :

०१. सहा. अधिक्षक, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.
०२. कनिष्ठ लिपीक, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद.
०३. जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. नोटीस बोर्ड

AMC Xerox Libre